- RNI NO. MAHMAR/25/A3029
- लातूर
- वर्ष : ७ वे, अंक नं. : ९३
- दि.०१ ऑगस्ट २०२६, वार : शनिवार
- पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक
# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990





## नागपुरात १७ वर्षीय महिला क्रिकेटपटूची आत्महत्या; क्रिकेट संघात निवड न झाल्याची खंत

**नागपुर :** महाराष्ट्रातील नागपूरमधून एक अत्यंत दुःखद घटना समोर आली आहे. नागपूरमधील १७ वर्षीय महिला क्रिकेटपटूने आत्महत्या केली आहे. या महिला क्रिकेटपटूची ओळख अदिती चौखंडे अशी पटली आहे. घटनास्थळी एक सुसाईड नोटही सापडली आहे. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला आणि तो शवविच्छेदनासाठी पाठवला. अदिती चौखंडे हिने क्रिकेट संघात निवड न झाल्याने आत्महत्या करण्याचं टोकाचं पाऊल उचललं असल्याचा उल्लेख सुसाईड नोटमध्ये केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अदिती चौखंडे ही मूळची महाराष्ट्रातील अकोला येथील होती.

गेल्या दोन वर्षांपासून ती नागपूरमधील लक्ष्मी नगर येथील 'उमालक्ष्मी अपार्टमेंट्स'मध्ये आपल्या आईसोबत व भावासोबत राहत होती. तिचे वडील अकोलामध्ये सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर आहेत. अदितीचं १२वी पर्यंत शिक्षण झालं होतं. अदिती तिच्या भावासोबतच क्रिकेट अकादमीत क्रिकेटचे धडे गिरवत होती. बुधवारी रात्री तिच्या आईबरोबर जेवण केल्यानंतर ती तिच्या खोलीत गेली आणि तिने आत्महत्या केली.

या घटनेवेळी तिचा भाऊ बाहेर गेला होता. अदितीच्या शेजारी सुसाईड नोट मिळाल्याचं पोलिसांनी सांगितलं. त्या चिठ्ठीत अदितीने संघात निवड न झाल्याची खंत व्यक्त केली होती. तसेच, आपल्या आई-वडिलांना अभिमान वाटेल अशी कामगिरी करण्याची इच्छा असल्याचंही तिने त्या पत्रात नमूद केलं होतं.

# अण्णा भाऊंच्या नावाचे नाट्यगृह त्यांचा विचार आणि साहित्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणारे केंद्र ठरेल - मुख्यमंत्री

## नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण

**मुंबई/प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. चिरागनगर येथे त्यांच्या स्मारक व संशोधन केंद्राच्या उभारणीसह भायखळा येथील नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण हा त्या दिशेने महत्त्वाचा टप्पा असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. हे नाट्यगृह त्यांचा विचार आणि साहित्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणारे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, बृहन्मुंबईतील लोकप्रतिनिधी, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, महानगरपालिका समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, स्थानिक नगरसेवक यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे वास्तव्य असलेल्या चिरागनगर येथे स्मारक उभारण्याच्या मागणीची पूर्तता करत राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक आणि संशोधन केंद्र उभारण्याचे काम सुरू केले आहे. त्याचबरोबर महानगरपालिकेने नूतनीकरण केलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण होणे, ही आनंदाची बाब आहे. येथे नाट्यप्रयोगांसाठी आवश्यक असलेल्या आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मंचाची क्षमता वाढविणे, कलाकारांसाठी सुसज्ज ग्रीनरूमची व्यवस्था करणे, यासह विविध सुधारणा करण्यात आल्याने आता सर्व प्रकारची दर्जेदार नाटके आणि सांस्कृतिक कार्यक्रम येथे सादर करता येतील. अभिजात कला, संस्कृती आणि साहित्य यांना प्रोत्साहन देतानाच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सांस्कृतिक संधी पोहोचविण्याचे कार्य या माध्यमातून व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करुन नाट्यगृहाबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी महानगरपालिकेचे कौतुक केले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वास्तववादी असून त्या काळातील सामाजिक परिस्थिती, अन्याय, संघर्ष आणि कामगारांचे जीवन यांचे प्रभावी चित्रण त्यातून दिसून येते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आलेल्या अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखणीच्या बळावर सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. त्यांच्या साहित्याची व्याप्ती जागतिक स्तरावर पोहोचली असून त्यांच्या साहित्याचे २७ भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची कीर्ती



जगभर पोहोचविण्यात त्यांचे योगदान अमूल्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

क्रांतिसूर्य साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपले आयुष्य शोषित, पीडित, दलित, कष्टकरी आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी समर्पित केले. त्यांच्या साहित्याने आणि शाहिरीने सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली; तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात जनजागृती करून जनसामान्यांना प्रेरित करण्याचे ऐतिहासिक कार्य केले, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.

राज्य शासनाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी विविध ठिकाणी स्मारके उभारली जात असून सांगली जिल्ह्यातील जन्मगाव असलेल्या वाटेगाव येथेही स्मारकाची उभारणी करण्यात येत आहे.

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे संघर्षमय जीवनाचे वास्तववादी चित्रण करणारे आहे. नाटक हा मराठी माणसाच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग असून नाट्यगृहाच्या नूतनीकरणामुळे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह आधुनिक, सुसज्ज आणि कलाकारांसाठी उपयुक्त झाले आहे. या नाट्यगृहातून नवोदित कलाकारांना संधी मिळेल; तसेच अण्णा भाऊ साठे यांचे विचार अधिक व्यापक स्तरावर पोहोचतील, असा विश्र्वासही उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी व्यक्त केला.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाच्या संघर्षाला शब्दबद्ध करत सामान्य माणसाला नायकाच्या भूमिकेत उभे केले. नूतनीकृत नाट्यगृह हे त्यांच्या विचारांना आणि सांस्कृतिक वारशाला तसेच नव्या कलाकारांना आणि नव्या विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असे प्रतिपादन मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकाद्वारे केले.

महापौर तावडे म्हणाल्या की, सुमारे ४० कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले हे अत्याधुनिक वातानुकूलित नाट्यगृह ७६१ आसनक्षमतेचे आहे. त्यामध्ये ग्रीनरूम, मेकअप रूम, विद्युत जनित्र, सीसीटीव्ही यंत्रणा आणि आधुनिक अग्निसुरक्षा सुविधा उपलब्ध आहेत. नाट्यगृह परिसरात पुस्तक विक्री दालन; तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनपटावर आधारित प्रदर्शनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. येत्या काळात हे नाट्यगृह नाटकांसह विविध सांस्कृतिक आणि सार्वजनिक उपक्रमांचे महत्त्वाचे केंद्र, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी आभार प्रदर्शन करताना या नाट्यगृहाच्या नुतनीकरणामध्ये सहकार्य केलेल्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# जळगाव जिल्ह्यात पावसाचा कहर !

**मुंबई /प्रतिनिधी:** भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यभरात पावसानं धुव्वाधार बॅटिंग केली असून यात अनेक जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढलं आहे. तर येणारे २४ तास महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांसाठी अत्यंत आव्हानात्मक असणार आहेत. हवामान विभागाने आज राज्याच्या विविध भागांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. जळगावसाठीही आज रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यानुसार जळगावमध्ये गुरुवारपासून सुरू असलेल्या संततधार आणि जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

जिल्ह्यातील बहुतांश सर्व लहान-मोठ्या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. अनेक ठिकाणी पुलांवरून पाणी वाहू लागल्याने प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. बोरी, अंजनीसह अनेक नद्यांना यंदाच्या पावसाळ्यात प्रथमच मोठा पूर आल्याने नदीकाठच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सततधार पावसामुळे अनेक गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने घरांचे तसेच घरगुती साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे लागले आहे. स्थानिक प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर तापी नदीवरील हतनूर धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. शुक्रवारी सकाळी १० वाजता या धरणाचे चार दरवाजे पूर्णपणे, तर ३२ दरवाजे दोन मीटरने उघडण्यात आले.

धरणातून तब्बल १ लाख ८५ हजार ८२८ क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने तापी नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे. तापी नदीला पूरस्थिती निर्माण झाल्याने नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने याचा फटका पिकांना बसला आहे. अनेक शेतामध्ये पाणी साचले आहे. काठावरील शेतांमधील कपाशीसह ज्वारी, उडीद, मूग, सोयाबीन, मका ही पिके पाण्याखाली गेली असून अनेक ठिकाणी उभी पिके आडवी पडली आहेत. पाण्याच्या वेगामुळे सुपीक माती वाहून गेल्याने शेतजमिनींचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिल्याने नुकसानीचे पंचनामे

# मोहम्मद रफी यांच्या स्मृतीदिनी अभिवादन..! मोहम्मद रफी यांना भारतरत्न देण्याची मागणी

**अहमदपूर/प्रतिनिधी :** महान गायक स्वरसम्राट पद्मश्री मोहम्मद रफी यांच्या सृतीदिनाच्या निमित्ताने शहरातील मोहम्मद रफी मार्गाच्या नामफलकास पुष्पहार अर्पण करून साहित्य संगीत कला अकादमीच्या वतीने सामूहिक अभिवादन करण्यात आले.




या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्रोही कवी राजेंद्र कांबळे यांनी अध्यक्षीय समारोप करताना मोहम्मद रफी सारखा अष्टपैलू गायक भविष्यात होणार नाही. त्यांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत करण्याचा प्रयत्न केला अशी भावना व्यक्त केली. तर कार्यक्रमाचे संयोजक तथा अकादमीचे अध्यक्ष युवकनेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी मोहम्मद रफी यांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून प्रेम, शांती, राष्ट्रभक्ती वध्दींगत करण्याचा संदेश दिला आहे. रफीं सारख्या महान गायकाचा आणी त्यांच्या कलेचा सन्मान करण्यासाठी भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देवून त्यांचा गौरव करणे गरजेचे आहे.या मागणीचा सर्व कला प्रेमींनी पाठपूरावा करावा असे अवाहन त्यांनी केले.तर नगर परिषदेचे गटनेते नगरसेवक राहूल शिवपूजे यांनी बोलताना अहमदपूर च्या सांस्कृतिक चळवळीत साहित्य संगीत कला अकादमीचे योगदान मोठे असल्याचे सांगितले.

या प्रसंगी गफारखान पठाण, बजरंग गायकवाड, उत्तमराव कांबळे, शेख मन्नानभाई, अॅड.रवी गायकवाड, मोहम्मद पठाण, नौशाद सय्यद, डॉ.बालाजी थिट्टे, राजुभाऊ आदींची प्रमुख उपस्थिती होती.




## संपादकीय...

### लोकशाहीर अण्णाभाऊ साठे-वंचितांच्या वेदनेला शब्द देणारा क्रांतिकारी साहित्यसूर्य!


लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन! अण्णाभाऊ साठे हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते शोषित, वंचित, कष्टकरी आणि उपेक्षित जनतेच्या जगण्याचे अस्सल भाष्यकार होते. त्यांच्या लेखणीतून समाजातील तळागाळातील माणसाचे दुःख, संघर्ष, स्वाभिमान आणि परिवर्तनाची आस प्रभावीपणे व्यक्त झाली. त्यामुळेच अण्णाभाऊंचे साहित्य आजही समाजमनाला अस्वस्थ करते आणि परिवर्तनाचा मार्ग दाखवते. अण्णाभाऊ साठे यांचे जीवन म्हणजे संघर्षातून उभ्या राहिलेल्या एका असामान्य प्रतिभेची प्रेरणादायी कहाणी आहे. अत्यंत प्रतिकूल सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीतून त्यांनी साहित्याच्या क्षेत्रात आपले अढळ स्थान निर्माण केले. शिक्षणाच्या आणि संधीच्या मर्यादा असतानाही त्यांनी अनुभवातून समाजाचे विद्यापीठ गाठले. त्यांनी जे पाहिले, जे भोगले आणि जे अनुभवले, तेच त्यांच्या साहित्याचा आत्मा बनले. अण्णाभाऊंच्या साहित्याची खरी ताकद त्यांच्या वास्तववादी दृष्टिकोनात होती. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि लावण्यांमध्ये केवळ मनोरंजन नव्हते, तर सामाजिक वास्तवाचे जिवंत चित्रण होते. त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकल्या गेलेल्या माणसाला आपल्या साहित्याच्या केंद्रस्थानी आणले. त्यामुळे त्यांचे साहित्य हे केवळ वाचनाचा विषय न राहता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरले. अण्णाभाऊ साठे यांनी कष्टकरी माणसाच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम केले. शेतकरी, मजूर, कामगार, भटके-विमुक्त, दलित आणि उपेक्षित समाजाच्या जीवनातील संघर्ष त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने मांडला. समाजाच्या तळाशी जगणाऱ्या माणसाच्या वेदनांना त्यांनी आवाज दिला. ज्यांच्याकडे स्वतःच्या व्यथा मांडण्यासाठी व्यासपीठ नव्हते, त्यांच्यासाठी अण्णाभाऊंची लेखणीच एक प्रभावी व्यासपीठ बनली. त्यांच्या साहित्यामध्ये स्वाभिमानाचा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. अन्याय सहन करणे हा नियतीचा भाग नसून अन्यायाविरुद्ध उभे राहणे हा माणसाचा अधिकार आहे, हा संदेश त्यांच्या साहित्यामधून सातत्याने दिसून येतो. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, हीच त्यांच्या विचारांची मध्यवर्ती भूमिका होती. अण्णाभाऊंच्या शाहिरीने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर मोठा प्रभाव टाकला. त्यांनी लोकभाषेचा प्रभावी वापर करून जनसामान्यांपर्यंत परिवर्तनाचे विचार पोहोचवले. त्यांच्या पोवाड्यांतून जनजागृती झाली, तर त्यांच्या साहित्यामधून सामाजिक विषमता आणि अन्यायाविरुद्ध प्रश्न उपस्थित झाले. म्हणूनच अण्णाभाऊंची शाहिरी ही केवळ कला नव्हती; ती समाजप्रबोधनाची आणि संघर्षाची चळवळ होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही अण्णाभाऊंच्या शाहिरीने जनतेच्या मनात अस्मितेची आणि संघर्षाची भावना जागवली. महाराष्ट्राच्या मातीशी असलेले त्यांचे नाते त्यांच्या साहित्यामधून प्रकर्षाने जाणवते. सामान्य माणसाच्या भाषेत, सामान्य माणसाच्या प्रश्नांवर आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले लेखन आजही प्रेरणादायी आहे. अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही कादंबरी त्यांच्या साहित्यिक प्रतिभेचे एक महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. अन्यायाविरुद्ध बंड करणाऱ्या आणि स्वाभिमानासाठी संघर्ष करणाऱ्या फकिराच्या व्यक्तिरेखेतून त्यांनी तत्कालीन सामाजिक वास्तवाचे प्रभावी दर्शन घडवले. 'फकिरा' ही केवळ एक कादंबरी नसून अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक बनलेली साहित्यकृती आहे. आज आपण अण्णाभाऊंची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करतो. विविध ठिकाणी व्याख्याने, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि अभिवादनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. मात्र, अण्णाभाऊंच्या विचारांना खरा सलाम करायचा असेल, तर केवळ त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून चालणार नाही. त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणे आणि त्यांच्या विचारांचा समाजजीवनात स्वीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आजही समाजात आर्थिक विषमता, सामाजिक भेदभाव, जातीय अन्याय आणि संधींची असमानता कायम आहे. तंत्रज्ञानाच्या युगात आपण प्रगतीचा दावा करीत असलो तरी समाजातील शेवटच्या माणसापर्यंत विकासाचा प्रकाश पोहोचला आहे का, हा प्रश्न विचारण्याची गरज आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधताना अण्णाभाऊंचे साहित्य आपल्याला अंतर्मुख करते. आजच्या तरुण पिढीने अण्णाभाऊ साठे यांना केवळ एका समाजाचे किंवा एका घटकाचे साहित्यिक म्हणून पाहू नये. ते संपूर्ण महाराष्ट्राचे आणि भारतीय समाजजीवनाचे महत्त्वाचे साहित्यिक होते. त्यांनी माणसाच्या जगण्याचा प्रश्न केंद्रस्थानी ठेवला. त्यांच्या साहित्याचा व्यापक आशय समजून घेतल्यास सामाजिक समता, बंधुता आणि न्याय यांचा मार्ग अधिक स्पष्ट होतो. अण्णाभाऊंच्या विचारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या विचारांची प्रेरणा दिसून येते. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी शिक्षण, संघटन आणि संघर्षाची गरज आहे, हा विचार समाजपरिवर्तनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. अण्णाभाऊंच्या साहित्याने वंचित समाजात आत्मविश्वास निर्माण केला आणि आपल्या हक्कांसाठी उभे राहण्याची प्रेरणा दिली. आजच्या काळात अण्णाभाऊंच्या साहित्याची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. सोशल मीडियाच्या युगात माहितीचा स्फोट झाला आहे; मात्र विवेकपूर्ण विचारांची कमतरता जाणवते. द्वेष, अफवा आणि सामाजिक तेढ वाढविणाऱ्या प्रवृत्तींपेक्षा समता, बंधुता आणि माणुसकीचा विचार समाजात रुजविणे आवश्यक आहे. अण्णाभाऊंचे साहित्य या दिशेने आपल्याला महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करू शकते. अण्णाभाऊंच्या जयंतीच्या निमित्ताने समाजातील सर्व घटकांनी त्यांच्या विचारांचा व्यापक अर्थ समजून घेण्याची गरज आहे. जात, धर्म, भाषा आणि प्रांत यांच्या पलीकडे जाऊन माणसाला केंद्रस्थानी ठेवणारा समाज निर्माण करणे, हीच त्यांच्या साहित्याची खरी शिकवण आहे. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळाल्याशिवाय खरी लोकशाही आणि खरी प्रगती पूर्ण होऊ शकत नाही. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची लोकप्रियता आजही कायम आहे, याचे कारण त्यांच्या लेखनातील जिवंतपणा आहे. त्यांच्या पात्रांमध्ये आपल्याला आजूबाजूचा माणूस दिसतो. त्यांच्या कथांमध्ये आजच्या समाजाचे प्रश्नही प्रतिबिंबित होताना दिसतात. म्हणूनच काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, जीवनशैली बदलली तरी अण्णाभाऊंच्या साहित्याचे महत्त्व कमी झालेले नाही. आज त्यांच्या नावाने अनेक योजना, पुरस्कार आणि संस्था उभ्या आहेत. हे निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, त्याचबरोबर त्यांच्या साहित्याचा अभ्यास शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये अधिक व्यापक पद्धतीने झाला पाहिजे. अण्णाभाऊंचे साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी भाषांतर, संशोधन आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर केला पाहिजे. अण्णाभाऊ साठे यांचे स्मरण म्हणजे केवळ भूतकाळाचा गौरव नव्हे, तर वर्तमानातील सामाजिक प्रश्नांवर विचार करण्याची संधी आहे. त्यांच्या विचारांची खरी परीक्षा आजच्या समाजात आहे. गरीब, कष्टकरी, श्रमिक आणि वंचित माणसाच्या जीवनात सन्मान, न्याय आणि समान संधी निर्माण होत आहेत का, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त त्यांच्या नावाने राजकारण करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा समाजकारणासाठी उपयोग करणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यांच्या नावाचा वापर केवळ घोषणा आणि कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता शिक्षण, सामाजिक न्याय, रोजगार आणि मानवी प्रतिष्ठेसाठी काम करण्याची गरज आहे. हीच त्यांच्या विचारांना खरी दिशा ठरेल. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीने आणि शाहिरीने सामान्य माणसाच्या संघर्षाला आवाज दिला. त्यांनी दाखवून दिले की, साहित्य हे केवळ मनोरंजनासाठी नसते; साहित्य समाजाला प्रश्न विचारू शकते, अन्यायाविरुद्ध आवाज उठवू शकते आणि परिवर्तनाची चळवळ उभी करू शकते. त्यांची ही परंपरा पुढे नेणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे. आज अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करताना आपण एक संकल्प करूया-समाजातील कोणत्याही माणसावर अन्याय होणार नाही, भेदभावाला थारा दिला जाणार नाही आणि प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू. अण्णाभाऊंच्या साहित्याचा आणि विचारांचा हा खरा सन्मान ठरेल. लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती म्हणजे सामाजिक समतेचा, कष्टकरी माणसाच्या सन्मानाचा आणि परिवर्तनाच्या विचारांचा उत्सव आहे. त्यांच्या क्रांतिकारी लेखणीला, शाहिरीला आणि सामाजिक बांधिलकीला विनम्र अभिवादन! अण्णाभाऊंचे विचार जिवंत राहोत, त्यांचे साहित्य वाचले जावो आणि त्यांच्या स्वप्नातील समताधिष्ठित समाजनिर्मितीचा लढा अधिक बळकट होवो, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली!

# साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या कृती व विचारांचा वारसा पुढे नेवूया..

सर्व जनतेस आंतरराष्ट्रीय साहित्यिक, शिवशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १ ऑगस्ट जयंतीनिमित्त शुभेच्छा. जागृत समाजच क्रांती प्रगती करू शकतो, हे सिद्ध झालेले आहे! जागृती ही प्रबोधनातून होते! चिकित्सा केल्यानंतर प्रबोधनाला सुरुवात होते. प्रबोधनाचा प्रारंभ हा धर्मचिकित्सा याने होतो.म्हणून तर केशव सीताराम ठाकरे यांना संपूर्ण भारत हा प्रबोधनकार ठाकरे म्हणून ओळखतो.. लोकशाहीर अण्णाभाऊ इथल्या व्यवस्था परिवर्तन लढाईत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृतीविचारांचा गाडा पुढे नेण्यासाठी प्रयत्न करतात..

डॉ बाबासाहेब आंबेडकर अण्णाभाऊ साठे यांच्या भेटीत त्यांचा गौरव करतांना म्हणतात माझ्या भाषणाने एकावेळी १०० ते १००० लोक प्रभावित होतात परंतु तुमच्या शाहिरीने अनेक लोक प्रभावित होतात!

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे मुळनाव हे तुकाराम भाऊराव साठे होय.त्यांच्या आईचे नाव हे वालुबाई होते. सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील 'वाटेगाव' हे त्यांचे जन्मगाव होय. तर १ऑगस्ट१९२० ही त्यांची जन्मतारीख होय.याबाबत त्यांची आई म्हणते की,त्यादिवशी कुणीतरी मोठा माणूस मेल्यामुळे सर्व बंद होते,त्यादिवशी चा जन्म. लोकशाहीर अण्णाभाऊ यांच्या पत्नीचे नावं कोंडुबाई होते,ज्या पाटण तालुक्यातील काळगाव येथील होत्या. अण्णाभाऊ यांना एक मुलगा होता, ज्याचे नाव मधुकर होते. अण्णाभाऊ यांना शाळेत १ली ला प्रवेश तर मिळाला पण पंत गुरुजी ने दुसऱ्या दिवशीच छडी फेकून मारली आणि अण्णाभाऊ यांची शाळा कायमची सुटली.दहा अकरा वर्षे वयातच रोजंदारीसाठी आईवडीलासोबत अण्णाभाऊ यांना मुंबईला यावे लागले. चिरागनगर झोपडपट्टी मुंबईत जीवन जगतांना अनेक वेदना सहन कराव्या लागल्या. साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा




४९ वर्षाचा जीवन संघर्ष ,कार्य आणि कर्तृत्व समजून घेतांना प्रेरणा मिळते. हृदय पिळवटून जाते.त्यांनी हमाली, बूटपॉलिश, घरगडी, हॉटेलबॉय, खाणकामगार, गिरणीकामगार आणि हातात पडेल ते काम केले.मिल बंद पडल्यावर तमाशात तबला,पेटी, ढोलकी वाजविणे सह जे जे भोगले,सहन केले, सोसले तेच लेखणी आणि वाणीच्या माध्यमातून मांडणारे अण्णाभाऊ हे जगद्गुरू संत तुकाराम, क्रांतीसुर्य जोतीराव फुले, विश्र्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे वारस होत.

साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे या प्रज्ञावंताने साहित्यातील प्रत्येक क्षेत्रात कथा, कादंबरी, नाटक, पोवाडे, गीत,लेख यात आपली जीवणानुभूतीची मांडणी केली आहे. आधुनिक भारताच्या नव्हे जगाच्या इतिहासात दीड दिवस शाळेत जाऊन ३५ कादंबऱ्या १३कथासंग्रह, ८ पटकथा,३ नाटके, १० प्रसिद्ध पोवाडे, १२ उपहासात्मक लेख, एक प्रवासवर्णन आणि अनेक वगनाट्य,गाणे, कवने रचली, गायन केली.

'माकडीचा माळ' ही भटक्या विमुक्त , पालावरील लोक यांचे वास्तव जीवन मांडनारी कादंबरी आहे. ज्यावर डोंगरची मैना हा चित्रपट निघाला. जगप्रसिध्द फकीरा या कादंबरीत वास्तव जीवन याची मांडणी केली आहे आणि ही कादंबरी विश्र्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखणीला अर्पण केली आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या अनेक साहित्यकृतीवर अनेक चित्रपट निघाले,खूप गाजले.स्त्रियांचे दुःख ,संघर्ष त्यांनी 'वैजयंता ', आवडी सह इतर साहित्यात मांडला आहेच. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा चेलीसेव साहित्यिकांकडून रशियन, पोलिश, इंग्रजी, फ्रेंच इत्यादीसह २७भाषांत अनुवाद झालेला आहे. स्टालिनचा पोवाडा,बर्लिनचा पोवाडा,चिनी क्रांतीवरील गौरवगान प्रसिद्ध आहेत.मार्च १९४८ ला रशियन सरकारने अण्णाभाऊ साठे यांचा सत्कार करून त्यांचा गौरव केला. याच बरोबर फ्रांस सरकारने पॅरिस साहित्य परिषद चे निमंत्रण देऊन गौरवासाठी बोलाविले. परंतु प्रवासासाठी पैसे नाहीत,म्हणून जाता आले नाही.त्याकाळातील आपल्या सरकारने केवळ बहुजनांच्या जातीमुळे योग्य 'नोंद' घेतली नाही.अण्णाभाऊ नी तमाशातील वंदन करतांना दैववाद नाकारून प्रयत्नवादाचा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा गौरव करतात, कवणात म्हणतात,

प्रथम नमो मायभूच्या चरणा,
छत्रपती शिवबाच्या चरणा,
स्मरुनी गातो कवणा.

याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा रशियात गायन केला. हेआहेतखरेशिवशाहीर,खरेमहाराष्ट्रभूषण, भारतरत्न,ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी. पण मनुवादी, जातीयवादी सरकारने आजपर्यंत त्यांना दुर्लक्षित केलेले आहेच.

याचबरोबर श्रमीकांच्या श्रमाचा सन्मान आणि विज्ञान यांचा पुरस्कार करतांना म्हणतात, पृथ्वी ही शेष नागाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कष्टकऱ्यांच्या हातावर तरलेली आहे. यातून हे स्पष्ट होते,की पुराणकथा या थोतांड आहेत,ज्यांना अण्णाभाऊंनी नकार दिला.

आणि आजही आम्ही वारस म्हणणारे नवस, कंदुऱ्या,गळ टोचणे, अमावस्या मागणे, मांगीरबाबा यात्रा, आसरा, शांती यातच गुरफटलेलो आहोत.! राष्ट्रपिता जोतीराव फुलेंच्या शाळेत शिकत असलेल्या ११वर्ष वयाच्या मुक्ता साळवे ला १५ फेब्रुवारी १८५५ ला हा वर्णव्यवस्थावादी धर्म आमचा नाही,हे कळले! तुमच्या बुद्धीला ज्ञानरुपी औषध द्या. ते १७० वर्षानंतर ही उच्च शिक्षितांना ही ध्यानात येत नाही. आणि आम्ही नव्याने बापू, बाप्या, कापू, बुवा यांचे अंधभक्त बनत आहोत,सत्संग करीत मेंदू गुलाम बनवीत आहोत. भांडवलदारी व्यवस्था यावर ही त्यांनी कडाडून प्रहार केला.

१५ऑगस्ट१९४७ ला आम्ही स्वतंत्र झालेलो आहोत,असा आमचा समज आहे.अण्णाभाऊ साठे यांनी हे मुठभर लोकांचे स्वातंत्र्य आहे!यात गुलामगिरी कायम आहेच,असे म्हणतात. म्हणून १६ ऑगस्ट १९४७ ला भाऊ गवाणकर,शाहीर अमर शेख आणि अण्णाभाऊ साठे यांनी पडत्या पावसात विशाल असा मोर्चा आझाद मैदान मुंबईत काढला.यात घोषणा दिली, यह आझादी झुठी है,देश की जनता भुकी है. ज्या मातंग जातीत अण्णाभाऊ साठे जन्मले त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश यावरच आपण गेले पाहिजे असा संदेश दिला. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सोलापूर, पुणे,मुंबई, उस्मानाबाद,कसबे तडवळ येथील मातंग समाज परिषदा मधून निर्देश मिळाले होते.कारण श्रीहरी शिंदे सारखा मातंग जातीतील कळंब येथील व्यक्ती रक्ताने लिहून तार पाठवितो की डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच आमचे प्रतिनिधी आहेत.याचबरोबर अण्णाभाऊ यांचे संदेशपर गीत.

जग बदल घालुनी घाव।
सांगूनी गेले मज भीमराव।
गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला का ऐरावत।अंग झाडूनी निघ बाहेरी ।घे बिनीवरती घाव.

अण्णाभाऊ साठे यांच्या शेवटच्या दिवसात त्यांना फार हाल सहन करावे लागले. तत्कालीन सरकारने त्यांना गुन्हेगार प्रमाणे वागणूक देऊन अटक केली. अमळनेरच्या तुरुंगात त्यांचा छळ केला. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना खायला सलग ५ दिवस अन्न न मिळाल्याने उपासमारीने त्यांचा १८ जुलै १९६९ ला मृत्यू झाला आहे. आज त्यांची जयंती साजरी करत असताना आम्ही हा इतिहास विसरता कामा नये! कारण जे लोक इतिहासातून बोध घेत नाहीत,ते इतिहास घडवू शकत नाहीत!त्यांचा इतिहास नष्ट केला जातो.यासाठी आम्ही चांगले शिक्षण घेणे गरजेचे आहे.त्याच बरोबर आजही गावकुसाबाहेर राहणारा आणि अज्ञानी, अशिक्षित,बेघर,वंचित, शोषित समाजाला 'लिंक ' करणे ही शिकलेल्या लोकांची जबाबदारी आहे.त्यासाठी आम्ही सर्वांनी 'पेबॅकटूसोसायटी'यान्यायानेकामकरूया, विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून निर्व्यसनी बनून काम करावे लागेल,उद्योग व्यवसायात पडावं लागेल उंच विचारांन स्वप्न पहावं लागतील! हीच अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीची शुभेच्छा असेल!.

लेखक :
**रामेश्वर तिरमुखे**
**जिल्हा परिषद शिक्षक**
**जालना ९४२०७०५६ ५३.**

# अण्णाभाऊ साठे : शब्दांना संघर्षाची धार देणारा लोकशाहीर!

## जयंतीच्या जयघोषापलीकडे अण्णाभाऊंच्या विचारांचा जागर कधी होणार?

महाराष्ट्राच्या मातीला संतांची, समाजसुधारकांची, विचारवंतांची आणि क्रांतिकारकांची मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेत अण्णाभाऊ साठे हे नाव केवळ एका साहित्यिकाचे नाही, तर ते उपेक्षितांच्या वेदनेला शब्द देणाऱ्या, शोषितांच्या संघर्षाला आवाज देणाऱ्या आणि अन्यायाविरुद्ध बंडाची मशाल पेटवणाऱ्या लोकशाहीराचे आहे. त्यांच्या लेखणीतून कागदावर उतरलेली माणसे काल्पनिक नव्हती तर ती आपल्या आजूबाजूला जगणारी, उपेक्षित, वंचित, कष्टकरी आणि संघर्ष करणारी माणसे होती. म्हणूनच अण्णाभाऊंचे साहित्य वाचताना आपण केवळ कथा वाचत नाही, तर एका समाजाचे अश्रू, आक्रोश, स्वप्ने आणि संघर्ष अनुभवतो. आज अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाईल. चौकाचौकात कमानी उभारल्या जातील, पुतळ्यांना हार घातले जातील, डीजेच्या तालावर घोषणा दिल्या जातील, सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव होईल. पण एक प्रश्न मात्र अस्वस्थ करणारा आहे, तो म्हणजे अण्णाभाऊंच्या विचारांचा खरा वारसा आपण किती जपला?

अण्णाभाऊंची जयंती ही केवळ एका महामानवाच्या स्मरणाचा दिवस नाही तर ती समाजाच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. त्यांच्या विचारांची खरी जयंती तेव्हाच साजरी होईल, जेव्हा समाजातील शेवटच्या माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी आपण उभे राहू. अन्याय, विषमता, जातीय भेदभाव, गरिबी आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवू. अन्यथा जयंतीचे कार्यक्रम होतील, पण अण्णाभाऊंचा विचार मात्र उपेक्षितच राहील. अण्णाभाऊ साठे यांनी जगण्याच्या शाळेतून शिक्षण घेतले. त्यांच्या आयुष्यात गरिबी होती, संघर्ष होता, उपेक्षा होती. पण या परिस्थितीसमोर




त्यांनी हार मानली नाही. त्यांनी आपल्या अनुभवांना साहित्याची ताकद दिली. 'फकिरा'सारख्या कादंबरीतून त्यांनी बंडखोर माणसाचे स्वप्न उभे केले. त्यांच्या साहित्याने समाजाच्या तळाशी असलेल्या माणसाला केंद्रस्थानी आणले. ज्यांना इतिहासाच्या पुस्तकांत जागा मिळाली नाही, ज्यांचा आवाज सत्तेच्या दालनापर्यंत पोहोचला नाही, ज्यांच्या कष्टावर समाजाची इमारत उभी राहिली, त्या माणसांना अण्णाभाऊंनी आपल्या लेखणीत अमर केले.

त्यांनी केवळ साहित्य निर्माण केले नाही, तर साहित्याची सामाजिक जबाबदारीही अधोरेखित केली. त्यांच्या लेखणीत मनोरंजन होते पण त्यापेक्षा मोठे वास्तव होते. त्यांच्या कथांमध्ये प्रेम होते, पण त्यापेक्षा मोठा संघर्ष होता. त्यांच्या पोवाड्यांत लय होती, पण त्या लयीच्या पाठीशी परिवर्तनाची हाक होती. आजच्या काळात अण्णाभाऊ साठे अधिक का आवश्यक आहेत, हा प्रश्न आपण स्वतःला विचारायला हवा. कारण आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आपण अभिमान बाळगतो, पण दुसरीकडे अजूनही समाजातील मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सन्मानाच्या मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करीत आहे. शहरांच्या उंच इमारती आकाशाला भिडत आहेत, पण त्याच शहरांच्या सावलीत झोपडपट्ट्यांमध्ये हजारो कुटुंबे जगण्याची लढाई लढत आहेत. डिजिटल भारताची स्वप्ने दाखविली जात आहेत, पण अनेक मुलांच्या हातात अजूनही पुस्तकाऐवजी मजुरीची साधने आहेत. ही विषमता अण्णाभाऊंना मान्य झाली असती का?

आजही जातीय भेदभावाच्या घटना घडतात. आजही श्रम करणाऱ्याला सन्मान मिळत नाही. आजही गरीब माणसाचा आवाज अनेकदा व्यवस्थेच्या कानापर्यंत पोहोचत नाही. शिक्षण आणि नोकरीच्या संधींमध्ये असमानता आहे. शेतकरी, कामगार, स्थलांतरित, भटक्या-विमुक्त आणि वंचित समाजातील लाखो लोक आपल्या अस्तित्वासाठी झगडत आहेत. अशा वेळी अण्णाभाऊंची लेखणी आपल्याला प्रश्न विचारते की, 'ज्या माणसाच्या श्रमावर समाज उभा आहे, त्या माणसाला न्याय कधी मिळणार?' अण्णाभाऊंच्या विचारांचा गाभा हा माणूस होता. म्हणूनच त्यांचे साहित्य कोणत्याही एका जातीपुरते, समूहापुरते किंवा प्रदेशापुरते मर्यादित राहत नाही. त्यांचे साहित्य माणसाच्या स्वाभिमानाची भाषा बोलते. ते सांगते की, गरिबी ही माणसाची ओळख नसते आणि वंचित असणे हा त्याचा दोष नसतो. संधीपासून वंचित ठेवलेला माणूस जेव्हा संधी मिळते तेव्हा तो इतिहास बदलू शकतो.

म्हणूनच अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला हार घालण्याबरोबरच त्यांच्या विचारांना आपल्या कृतीत उतरवण्याची गरज आहे. त्यांच्या नावाने मोठमोठे कार्यक्रम घेण्यापेक्षा एखाद्या गरीब विद्यार्थ्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे अधिक अर्थपूर्ण ठरेल. त्यांच्या साहित्यावर चर्चा करण्याबरोबरच ते साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे अधिक आवश्यक आहे. जयंतीच्या दिवशी घोषणाबाजी करण्यापेक्षा वर्षभर सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहणे हीच खरी आदरांजली ठरेल. आज अण्णाभाऊंच्या नावाचा वापर करणाऱ्यांनीही आत्मपरीक्षण करायला हवे. अण्णाभाऊंच्या विचारांची मिरवणूक काढणे सोपे आहे, पण त्यांच्या विचारांनुसार जगणे कठीण आहे. त्यांच्या नावावर राजकारण करणे सोपे आहे, पण वंचितांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणे कठीण आहे. त्यांच्या पुतळ्याला हार घालणे सोपे आहे, पण त्यांच्या साहित्याचा आशय समजून घेणे आणि समाज बदलण्यासाठी कृती करणे कठीण आहे.



अण्णाभाऊंना खऱ्या अर्थाने अभिवादन करायचे असेल, तर समाजातील शेवटच्या माणसापर्यंत न्याय पोहोचविण्याची शपथ घ्यावी लागेल. शिक्षणाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवावा लागेल. जात, धर्म, भाषा आणि प्रांताच्या भिंती ओलांडून माणुसकीचा सेतू बांधावा लागेल. ज्यांच्या हातात श्रम आहे, त्यांना सन्मान, ज्यांच्या डोळ्यात स्वप्न आहे, त्यांना संधी आणि ज्यांच्या आयुष्यात अन्याय आहे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी समाज म्हणून उभे राहावे लागेल. अण्णाभाऊ साठे हे केवळ इतिहासातील एक पान नाहीत. ते वर्तमानाला अस्वस्थ करणारा प्रश्न आहेत. ते अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आहेत. ते संघर्षातून निर्माण होणाऱ्या परिवर्तनाची शक्ती आहेत.

त्यांच्या शब्दांना आजही धार आहे, कारण समाजातील विषमता अजून संपलेली नाही. त्यांची लेखणी आजही जिवंत आहे, कारण शोषितांच्या वेदना अजून संपलेल्या नाहीत. म्हणून या जयंतीदिनी अण्णाभाऊंच्या प्रतिमेला हार घालताना एक प्रश्न स्वतःला विचारूया, आपण अण्णाभाऊंचे भक्त आहोत की त्यांच्या विचारांचे वारसदार? कारण अण्णाभाऊंच्या जयंतीचा खरा अर्थ फटाके, मिरवणुका आणि घोषणांमध्ये नाही. तो आहे एखाद्या उपेक्षिताच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटवण्यात. तर तो आहे अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यात. तो आहे शिक्षणासाठी संघर्ष करण्यात. तो आहे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्यात आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, अण्णाभाऊंच्या नावाचा जयघोष करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा जागर करण्यामध्येच त्यांच्या जयंतीचे खरे सार्थक आहे! अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

------------

**प्रवीण बागडे**
**नागपूर- मो. क्र. ९९२३६२०९१९**

# राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणीसाठी मानकांबाबत विधेयकाच्या अनुषंगाने सूचना पाठविण्याचे आवाहन



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणीसाठी मानकांबाबत विधेयका च्या अनुषंगाने सूचना, सुधारणा पाठवू इच्छिणाऱ्या नागरिक व संबंधितांनी आपल्या सूचना, सुधारणा तीन प्रतींमध्ये गुरुवार, २० ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय येथे पाठवाव्यात असे विधान मंडळाचे जितेंद्र भोळे यांनी सांगितले आहे.

महाराष्ट्र विधानसभा २०२६ चे विधेयक क्रमांक ५१ – महाराष्ट्र राज्यातील चिकित्सा आस्थापनांची नोंदणी, विनियमन व तपासणी करण्यासाठी, अशा आस्थापनांद्वारे ज्या सुविधा व सेवा पुरविण्यात येतील त्यांची किमान मानके विहित करण्याकरिता; आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक असे त्याचे पूर्ण नाव असून सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या संयुक्त समितीकडे हे विधेयक विचारार्थ पाठविण्यात आले आहे.

विधेयकातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्यातील जनता तसेच संबंधित विषय क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था, संघटना, छत्र्जी यांचेकडून सूचना, सुधारणा मागविण्याचा निर्णय समितीने २९ जुलै रोजी झालेल्या बैठकीत घेतला आहे. सूचना, सुधारणा पाठवू इच्छिणाऱ्या नागरिक व संबंधितांनी आपल्या सूचना, सुधारणा तीन प्रतींमध्ये गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने निम्नस्वाक्षरीत श्री. जितेंद्र भोळे, सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई-४०००३२ यांच्याकडे सर्वसाधारण व खंडनिहाय या स्वरुपात पाठवाव्यात. अथवा महाराष्ट्र विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या https://mahalegislature.org.in/assembly-bill-51/ या लिंकवर देण्यात आलेल्या गुगल फॉर्म (Google Form) द्वारे युनिकोड फॉन्ट (Unicode Font) मध्ये पाठवता येतील.

या विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रती शासकीय ग्रंथागार पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर तसेच व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई-४००००४ यांचेकडे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.तसेच सदरहू विधेयक (मराठी /इंग्रजी) महाराष्ट्र विधानमंडळाच्या उपरोक्त संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे असे सचिव, विधानमंडळ सचिवालय यांनी कळविले आहे.

## नमन तुला शाहीरा

साहित्याच्या जगी गाजली,
तुझ्या लेखणीची धार...
महाराष्टाच्या लोकशाहिरा
नमन तुला शतवार...
कवनामधुनी तुझ्या चमकली,
शिवबाची तलवार....
महाराष्ट्राच्या लोकशाहीरा
नमन तुला शतवार ...।।ध्रु।।
घेऊनी शिक्षण बहुजनांनी
व्हावे शूर सूदन्यानी,
शेषनागाच्या डोई धरणी...
खोटी ठरली वाणी...२
कष्टकऱ्यांचा असे मनगटी,
या पृथ्वीची भार....।।१।।
लढली ऐसी तुच लढाई,
संयुक्त महाराष्ट्राची...
न्याय मिळावा, मिळावी भाकर,
सकाळांना कष्टाची...२
मालकशाही, मुजुमगिरीचा,
केला तु संहार....।।२।।
येती अंगावरती शहारे ,
नवल तयाचे वाटे...
अजरामर ते जगी जाहले,
अण्णाभाऊ साठे.. २
शाहीर वाल्मीक सदा वर्णितो,
तुझी थोरवी फार...।।३।।
महाराष्ट्राच्या लोकशाहीरा,
नमन तुला शतवार...३
------------



रचना
**शाहीर वाल्मीक फाजगे**
**खेडगावकर मो.८६००११४१९३**
**खेडेगांव, ता.चाळीसगाव, जि.जळगांव**

## रात्री घरफोडी करणाऱ्या आरोपीला ४८ तासाच्या आत ठोकल्या बेड्या

### ३ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची धाडसी कारवाई

**केज/प्रतिनिधी :** रात्री घरफोडी करणाऱ्या आरोपीला ४८ तासाच्या आत ठोकल्या बेड्या ठोकून आरोपीच्या ताब्यातील ३ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल केला असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाडसी कारवाई केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४८१/२०२६ कलम३३१(४), ३०५(र) भारतीय न्याय संहिता नुसार घरफोडीचा नोंद झाला होता. सदरील गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा,बीड हे करीत होते. दिनांक२९/७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांचे पथक हे केज पोलीस ठाण्याच्या हद्दीत सदरील गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेत होते. आरोपीचा शोध घेत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी ऋषिकेश दिलीप काळे रा. महात्मा फुले नगर केज यांनी केला आहे. यावरून ऋषिकेश दिलीप काळे यास त्याच्या फुलेनगर भागातील राहत्या घरातून ताब्यात घेतले.

सदरील गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिक विचारपूस केली असता त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याने चोरी केलेली रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने बाबत विचारणा केली असता त्याने रोख रक्कम व चांदीचे दागिने घरात ठेवले असल्याचे सांगितले. दोन पंच समक्ष आरोपीच्या ताब्यातून रोख रक्कम२ लाखों हजार रुपये व सोन्या चांदीच्या दागिन्याची किंमत ७४ हजार असा एकुण ३लाख ५५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीस पुढील कारवाई कामी केज पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिकडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटरम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार बप्पासाहेब घोडके, दिलीप गीते, दिलीप जोगदंड, जफर पठाण, गणेश मराडे यांनी केली आहे.



# भाकरी देणेही गुन्हा ठरले आहे का?

## जंतर-मंतरच्या आंदोलनकर्त्यांना अन्न देणाऱ्या जुनैदच्या घरापर्यंत पोलिस का पोहोचले? सत्तेने आंदोलकांना उत्तर द्यावे, त्यांच्या कुटुंबांना भयभीत करू नये!

लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे गुन्हा नाही. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे गुन्हा नाही. आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरणे गुन्हा नाही. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आंदोलन करणाऱ्या उपाशी माणसाला दोन घास अन्न देणे तर कोणत्याही सभ्य समाजात गुन्हा असूच शकत नाही! मग जंतर-मंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि तरुणांना अन्न-पाणी पुरवणाऱ्या जुनैद खान यांच्या घरापर्यंत पोलिस का पोहोचले? त्यांच्या कुटुंबीयांची चौकशी का झाली? वृद्ध वडिलांना आणि भावाला प्रश्नांच्या फैरीला सामोरे का जावे लागले? हा दबाव होता की नेहमीची चौकशी? जर ही केवळ चौकशी असेल, तर तिचे कारण काय? आणि जर कोणताही गुन्हा नसेल, तर एका नागरिकाच्या कुटुंबाला पोलिसांच्या दारात उभे करण्याची गरज काय? हे प्रश्न फक्त जुनैदच्या घराचे नाहीत तर हे प्रश्न आज भारतीय लोकशाहीच्या घराचे आहेत!

जंतर-मंतरवर आंदोलन करणारे विद्यार्थी कोण आहेत? ते या देशाचे नागरिक आहेत. त्यांच्या हातात दगडाऐवजी प्रश्न आहेत. त्यांच्या डोळ्यांत भविष्याची चिंता आहे. त्यांच्या आवाजात शिक्षण, रोजगार, परीक्षा व्यवस्था आणि भवितव्याबद्दलचा आक्रोश आहे. त्यांच्या मागण्या सरकारला मान्य नसतील, तर सरकारने त्या मागण्यांना उत्तर द्यावे. त्यांच्याशी चर्चा करावी. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. पण आंदोलकांना अन्न देणाऱ्या माणसाच्या घरापर्यंत पोलिस पोहोचत असतील, तर हा प्रकार लोकशाहीच्या कोणत्या व्याख्येत बसतो? सत्ता प्रश्नांना घाबरते तेव्हा ती प्रश्न विचारणाऱ्याला लक्ष्य करते. पण प्रश्न विचारणाऱ्याला अन्न देणाऱ्याच्या घरापर्यंत पोहोचते, तेव्हा सत्तेची भीती आणखी खोल झाल्याचे दिसते!

या प्रकरणातील आरोप पोलिसांनी नाकारले असतील, तर त्यांनी सत्य जनतेसमोर स्पष्ट करावे. पोलिसांनी कोणतीही बेकायदेशीर कारवाई केली नसेल, तर संपूर्ण वस्तुस्थिती पारदर्शकपणे सांगावी. पण केवळ आरोप नाकारून प्रश्न संपत नाहीत. कारण लोकशाहीत नागरिकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि सत्तेने त्यांची उत्तरे देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. जुनैदने आंदोलकांना अन्न दिले



असेल, तर त्याचा गुन्हा काय?, त्याने बंदूक दिली का?, त्याने बॉम्ब दिला का?, त्याने हिंसाचाराला प्रोत्साहन दिले का?, की त्याने फक्त भुकेल्या माणसाला भाकरी दिली? जर भाकरी देणे गुन्हा असेल, तर मग या देशातील लंगर, अन्नछत्रे, समाजसेवी संस्था आणि आंदोलनस्थळी भोजन देणाऱ्या हजारो हातांचे काय? एखाद्या आंदोलनात सहभागी असलेल्या माणसाला पाणी देणाऱ्याला उद्या 'आंदोलनाचा समर्थक' म्हणून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाणार आहे का? सत्तेला विरोध करणाऱ्यांना उपाशी ठेवून लोकशाही मजबूत होत नाही.

लोकशाहीचा अर्थ असा नाही की नागरिकांनी फक्त मतदानाच्या दिवशी बोलावे आणि उर्वरित पाच वर्षे गप्प बसावे. लोकशाहीचा अर्थ असा आहे की नागरिकांनी सरकारला प्रश्न विचारावेत, चुकीच्या धोरणांवर टीका करावी, अन्यायाविरुद्ध आंदोलन करावे आणि गरज पडल्यास रस्त्यावर उतरावे. सरकारला आंदोलन आवडत नसेल, तर त्याने आंदोलनाची कारणे संपवावीत. आंदोलकांना गप्प करण्यासाठी पोलिसांचा वापर करणे हा कोणत्याही लोकशाही सरकारचा गौरव नसतो. आणि आंदोलकांच्या कुटुंबीयांवर मानसिक दबाव आणल्याचा आरोप होत असेल, तर तो प्रकार तर आणखी गंभीर आहे. सरकारकडे सत्ता आहे तर नागरिकांकडे संविधान आहे. सरकारकडे पोलिस आहेत तर नागरिकांकडे लोकशाही आहे. सरकारकडे प्रशासन आहे तर नागरिकांकडे प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. म्हणूनच सत्तेने हे लक्षात ठेवावे की पोलिसांची ताकद वापरून एखाद्या घराच्या दारावर पोहोचता येते; पण त्या घरातील भीतीला, अश्रूंना आणि प्रश्नांना कायमचे कैद करता येत नाही.

विशेषतः एखाद्या कुटुंबाला त्याच्या धार्मिक ओळखीमुळे संशयाच्या नजरेने पाहिले जात असेल, तर हा प्रकार संविधानाच्या मूलभूत मूल्यांवर थेट आघात आहे. भारताच्या संविधानाने नागरिकाची ओळख धर्मावर ठरवलेली नाही. कायद्याच्या दृष्टीने सर्व नागरिक समान आहेत. मग चौकशी करताना एखाद्याचा धर्म महत्त्वाचा ठरत असेल, तर हा प्रश्न केवळ जुनैदचा राहत नाही; तो प्रत्येक भारतीयाच्या नागरिकत्वाचा प्रश्न बनतो. आज जुनैद आहे, उद्या एखादा हिंदू असेल तर परवा एखादा शीख असेल. त्यानंतर एखादा बौद्ध, ख्रिश्चन किंवा अन्य कोणताही भारतीय असेल. सत्तेला जर नागरिकांच्या धर्मानुसार संशय घ्यायची सवय लागली, तर संविधानातील 'बंधुता' हा शब्द केवळ पुस्तकाच्या पानावर उरेल! म्हणूनच या प्रकरणाकडे राजकीय चष्म्यातून पाहण्यापेक्षा संविधानाच्या चष्म्यातून पाहण्याची गरज आहे.

पोलिसांना गुन्ह्याची चौकशी करण्याचा अधिकार आहे. परंतु तो अधिकार अमर्याद नाही. कायद्याचे राज्य म्हणजे पोलिसांना अमर्याद अधिकार नव्हे; तर पोलिसांसह प्रत्येकाला कायद्याच्या चौकटीत ठेवणे होय. जर जुनैदविरुद्ध कोणताही गुन्हा असेल, तर कायद्यानुसार कारवाई करा. जर तो आंदोलनातील हिंसाचारात सहभागी असेल, तर पुरावे सादर करा. जर त्याच्यावर कोणतेही आरोप असतील, तर न्यायालयासमोर मांडा. पण जर त्याचा अपराध एवढाच असेल की त्याने आंदोलन करणाऱ्या तरुणांना जेवण दिले, तर मग सरकारने स्वतःला आरशात पाहण्याची वेळ आली आहे. कारण भुकेल्या माणसाला अन्न देणारा हात तोडून लोकशाहीचे पोट भरत नाही!

आज देशातील तरुण प्रश्न विचारत आहेत. त्यांना रोजगार हवा आहे. त्यांना पारदर्शक परीक्षा व्यवस्था हवी आहे. त्यांना त्यांच्या भविष्याची हमी हवी आहे. त्यांना पेपरफुटी, भ्रष्टाचार आणि अन्यायापासून मुक्त व्यवस्था हवी आहे. या प्रश्नांना उत्तर देणे सरकारचे कर्तव्य आहे. पण प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी आंदोलकांच्या घरांपर्यंत चौकशी पोहोचत असेल, तर सरकारने विचार करावा, प्रश्न संपले आहेत की सरकारची उत्तरे संपली आहेत? लोकशाहीमध्ये आंदोलन हे सत्तेविरुद्धचे युद्ध नसते. ते सत्तेला तिची जबाबदारी आठवून देणारे माध्यम असते. आज जंतर-मंतरवर तरुण आंदोलन करत आहेत. उद्या दुसऱ्या शहरात शेतकरी आंदोलन करेल. परवा कर्मचारी रस्त्यावर उतरतील. कुठेतरी महिला प्रश्न विचारतील. कुठेतरी विद्यार्थी आवाज उठवतील.

प्रत्येक वेळी सरकारने पोलिस पाठवायचे का?, प्रत्येक वेळी आंदोलनकर्त्यांच्या कुटुंबांकडे संशयाने पाहायचे का?, प्रत्येक वेळी त्यांच्या समर्थकांना लक्ष्य करायचे का? आणि प्रत्येक वेळी धर्माच्या नावाने समाजात भीती निर्माण होऊ द्यायची का? ही पद्धत लोकशाहीची नाही. ही भीतीच्या राजकारणाची सुरुवात आहे. सरकारने लक्षात ठेवावे की, नागरिक घाबरला म्हणून लोकशाही संपत नाही पण नागरिकांच्या मनातून सरकारवरील विश्र्वास संपला, तर लोकशाहीची मुळे नक्कीच कमकुवत होतात. जुनैदच्या घरात जर खरोखरच पोलिस चौकशीसाठी गेले असतील, तर त्या चौकशीचे कारण जनतेला कळले पाहिजे. कुटुंबीयांना मानसिक त्रास दिल्याचा आरोप असेल, तर त्याची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे आणि आरोप चुकीचे असतील, तर पोलिसांनीही पारदर्शकपणे वस्तुस्थिती मांडली पाहिजे. कारण सत्तेची खरी ताकद नागरिकांना घाबरवण्यात नसते; तर नागरिकांचा विश्र्वास जिंकण्यात असते.

जंतर-मंतरवर आंदोलन करणाऱ्या तरुणांना सरकारने लाठीने नव्हे, संवादाने उत्तर द्यावे. त्यांच्या प्रश्नांना गुन्हा समजू नये. त्यांच्या आवाजाला शत्रूचा आवाज समजू नये. आणि त्यांना अन्न देणाऱ्या हातांना संशयाच्या नजरेने पाहू नये. कारण भारताची लोकशाही इतकी कमजोर नाही की एका ताटातील भाकरीने ती कोसळेल. पण ती इतकी नाजूक नक्कीच आहे की एका वृद्ध बापाच्या डोळ्यात पोलिसांच्या भीतीचे अश्रू आले, तर संविधानाच्या आत्म्याला वेदना होतात! आज प्रश्न जुनैदचा नाही, आज प्रश्न एका मुस्लिम कुटुंबाचा नाही, आज प्रश्न एका आंदोलनाचा नाही. तर आज प्रश्न आहे या देशात नागरिकाने नागरिकाला अन्न देण्याचे स्वातंत्र्य सुरक्षित आहे का? जर उत्तर 'होय' असेल, तर जुनैदच्या घरापर्यंत पोहोचलेल्या पोलिसी सावलीचे स्पष्टीकरण सरकारने द्यावे आणि जर उत्तर 'नाही' असेल, तर मग देशाने ठरवावे की आपण संविधानाच्या भारतात जगतो आहोत की भीतीच्या भारतात!

सत्तेने हे लक्षात ठेवावे की, आंदोलन दडपता येते, आवाज दाबता येतो, घरावर पोलिस पाठवता येतात पण भुकेल्या माणसाला भाकरी देण्याची माणुसकी बंदिस्त करता येत नाही. कारण ज्या दिवशी या देशातील नागरिक भाकरी देण्याआधी पोलिसांची परवानगी घेऊ लागेल, त्या दिवशी लोकशाही जिवंत असली तरी तिच्या आत्म्याचा मृत्यू झालेला असेल आणि तो दिवस येऊ नये, म्हणूनच आज प्रश्न विचारणे गरजेचे आहे. जुनैदने आंदोलकांना भाकरी दिली पण सत्तेने त्याच्या घरापर्यंत भीती का पोहोचवली? आंदोलनाला उत्तर द्यायचे असेल तर सरकारने प्रश्नांची उत्तरे द्यावीत, आंदोलकांच्या कुटुंबांना लक्ष्य करू नये!



------------
**प्रवीण बागडे**
**नागपूर- मो. क्र. ९९२३६२०९१९**

## शाहीर मधुकर कदम यांना मातृशोक



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील पैठण (सा.) येथील जेष्ठ महिला शांताबाई मनोहर कदम वय ८५ वर्षे यांचे वृद्धापकाळाने दिनांक २६ जुलै २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्यावर पैठण(सा.) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्र्चात तीन मुले,एक मुलगी,सुना नातवंडे, असा मोठा परिवार आहे.त्या शांत व प्रेमळ स्वाभावाच्या होत्या. त्यांच्या या प्रेमळ स्वाभावामुळे त्या मावशी म्हणून सर्वपरिचित होत्या. त्या शाहीर मधुकर कदम यांच्या मातोश्री होत.

# इतिहास जिवंत होणार क्रांतीची गाथा सांगणाऱ्या 'पत्री सरकार १९४२'चे पहिले पोस्टर प्रदर्शित

**लातूर/प्रतिनिधी** :भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक धगधगत पर्व रुपेरी पडद्यावर साकारण्यासाठी सज्ज झालं आहे. 'पत्री सरकार १९४२' या आगामी मराठी चित्रपटाचं पहिलं वहिलं पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आणि या पोस्टरने चित्रपटाबद्दलची उत्सुकता चांगलीच वाढवली. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा प्रांतात १९४२ साली प्रतिसरकार स्थापन करून ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडलं. नाना पाटलांच्या प्रेरणेने क्रांती अग्रणी जी डी लाड, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्यासारख्या हजारो देशभक्तांनी दरोडेखोरी, जुलुमी,सावकारशाही, इंग्रज सत्ता यांच्याशी यशस्वी लढा देऊन पत्री सरकारची दहशत थेट लंडनच्या संसदेत पोहोचवली. प्रतिसरकारच्या अशा अनेक अज्ञात क्रांतीवीरांची धगधगती शौर्यगाथा घेऊन 'पत्री सरकार १९४२' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येण्यास सज्ज झाला आहे.

पोस्टर मध्येच हातात बंदूक घेतलेला क्रांतिकारक, घोड्यावर स्वार झालेला योद्धा आणि ब्रिटिश सैनिक यांच्यातील संघर्षाची झलक पाहायला मिळतेय. पार्श्वभूमीला दिसणारी आग, धूर आणि युद्धजन्य वातावरण चित्रपटाच्या कथानकातील संघर्षाची तीव्रता अधोरेखित करत आहे. चित्रपटाच्या समोर आलेल्या पोस्टरने एक वेगळाच ऐतिहासिक आणि लढाऊ अंदाज येत आहे.

चित्रपटाच्या पोस्टरवरून हा सिनेमा केवळ मनोरंजन न करता इतिहासातील एका महत्त्वपूर्ण पर्वाची आठवण करून देणारा ठरणार असल्याचं चित्र दिसून येत आहे. 'भागीरथी मोशन पिक्चर' तर्फे 'पत्री सरकार १९४२' हा चित्रपट असून विशाल गोविंदराव जाधव यांनी चित्रपटाची निर्मिती लीलया पार पाडली. तर चित्रपटाचे गीत, संगीत, लेखन, दिग्दर्शन याची धुरा मनीष अनसुरकर यांनी पेलली आहे. कर्तव्य मोकल यांनी संकलनाची बाजू सांभाळली आहे तर संदीप वाटवे, सुमेध मराठे, परमहंस पाठक यांचे छायाचित्रण आहे. सौरभ लता शिवकुमार यांनी पार्श्व संगीताची जबाबदारी उचलली असून विशाल जाधव, गोरख गुंजाळ, अनन्या नाईक, आनंद मेनन यांनी आपल्या दमदार आवाजात चित्रपटातील गाणी स्वरबद्ध केली आहेत.

चित्रपटाचे दिग्दर्शक मनीष अनसुरकर म्हणाले, ''ब्रिटिशांच्या विरोधात पेटलेली क्रांती नेमकी कशी होती हे दाखवण्याचा प्रयत्न 'पत्री सरकार १९४२' या चित्रपटातून केला आहे. गीत, संगीत, लेखन, दिग्दर्शन या धुरा सांभाळताना बरंच दडपण होतं. कारण क्रांतिसिंह नाना पाटील यांचा प्रवास मोठ्या पडद्यावर या चित्रपटातून दाखवायचा होता. पण संपूर्ण टीमच्या मदतीने ते सहज शक्य झालं. क्रांतीच्या इतिहासाला सिनेमॅटिक रूप देत हा चित्रपट बनवला आणि त्याचं पहिलं पोस्टर समोर आलंय. चित्रपटातील टिझर, ट्रेलरवरून आणखी गुपित उलगडतील आणि उत्सुकता नक्कीच वाढेल''. महाराष्ट्राच्या मातीत पेटलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्याची आणि क्रांतीकारकांच्या शौर्याची कथा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार असल्याने 'पत्री सरकार १९४२' या चित्रपटाकडे आता सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे.




## वाहनांच्या 'फिटनेस' प्रमाणपत्रांमधील गैरव्यवहारांचा अहवाल मागवला

**मुंबई/प्रतिनिधी** : वाहनांच्या फिटनेस प्रमाणपत्र प्रक्रियेत नियमांना बगल देऊन गैरव्यवहार झाल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला होता. मोटार वाहन अधिनियमातील नमुना ३८अ अंतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या या फिटनेस प्रमाणपत्रांमधील अनियमिततेची सखोल चौकशी करून अहवाल तात्काळ सादर करावा आणि दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी परिवहन आयुक्तांना दिले.

आरटीओ विभागातील भ्रष्टाचाराच्या आरोपांनंतर यापूर्वीच एसआयटी स्थापन करण्यात आली होती. त्याच धर्तीवर आता वाहन फिटनेस प्रक्रियेतील भ्रष्टाचारावरही कठोर भूमिका घेत परिवहन विभागाने नियमबाह्य कारभाराला चाप लावण्याचे संकेत दिले आहेत. नमुना ३८अ बाबतच्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी सह परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली ५ मार्च २०२६ रोजी समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या तपासात अनेक धक्कादायक आणि गंभीर बाबी समोर आल्या आहेत.

नमुना ३८अ जारी झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत मूळ नोंदणी प्राधिकाऱ्याने नमुना ३८ जारी करणे बंधनकारक असताना अनेक प्रकरणांत १५ दिवसांनंतर प्रमाणपत्र दिले गेले. इतर राज्यांतील परिवहन कार्यालयांनी नमुना ३८अ जारी केल्यानंतर महाराष्ट्रातील मूळ नोंदणी प्राधिकाऱ्याने नमुना ३८ जारी करणे अपेक्षित असताना, काही प्रकरणांत भलत्याच कार्यालयांकडून हे प्रमाणपत्र जारी करण्यात आले.

याहून गंभीर बाब म्हणजे राष्ट्रीय परवाना असलेल्या अनेक वाहनांमध्ये व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस (व्हीएलटीडी) नसतानाही नमुना ३८ जारी करण्यात आला. तसेच १ जानेवारी २०१९ नंतर उत्पादित काही प्रवासी वाहनांमध्ये व्हीएलटीडी आणि आवश्यक स्पीड लिमिट डिव्हाइस नसतानाही फिटनेस प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे उघड झाले आहे. पनवेल, पुणे, पिंपरी-चिंचवड, वाशी, ठाणे, अंधेरी, वडाळा, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील परिवहन कार्यालयांमध्ये हे गैरप्रकार मोठ्या प्रमाणावर आढळले आहेत.

## गायक मंगेश बोरगावकर यांच्या सुमधुर गायनाने लातूरकर रसिक मंत्रमुग्ध

**लातूर/प्रतिनिधी** : येथे आषाढी एकादशीचे औचित्य साधून सुप्रसिद्ध पार्श्वगायक मंगेश बोरगावकर यांनी आपल्या सुमधुर आवाजात सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, अवघे गरजे पंढरपूर, अबीर गुलाल उधळीत रंग, विठ्ठल नामाचा गजर, कानडा राजा पंढरीचा, माझे माहेर पंढरी अशा एकाहून एक सरस अभंगाच्या गायनाने लातूरकर रसिकांना मंत्रमुग्ध केले.

गायक मंगेश बोरगावकर यांनी संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकोबाराय, संत चोखामेळा, संत नामदेव आणि संत जनाबाई या महान संत परंपरेतील संतांच्या रचना आपल्या सुमधुर आवाजात सादर करून भक्तिमय वातावरण निर्माण केले आणि रसिक भक्तांचे कान या सुरेल गायनाने तृप्त झाले. यावेळी विठ्ठल विठ्ठल च्या गजराने सभागृहात एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाली होती. लोकमत सखी आणि द्वारकादास शामकुमार यांच्या



सहकार्याने भक्तिरंग या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या भक्तिमय सोहळ्यामुळे लातूरकर रसिक श्रोत्यांना प्रत्यक्ष पंढरीच्या वारीची आणि भक्तीरसाची अविस्मरणीय अनुभूती मिळाली.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून झाली.यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, श्री. गोविंदराव माकणे, सुप्रसिद्ध गायक मंगेश बोरगावकर, तालमणी डॉ. राम बोरगावकर, अनिता सावंत - देशपांडे, द्वारकादास श्यामकुमारचे श्री.राजू जाधव, सोनसखीचे धर्मेश कविथिया, लोकमतचे वृत्त संपादक श्री. धर्मराज हल्लाळे, सहाय्यक शाखा व्यवस्थापक मोहन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या संगीतमय प्रवासात गायक मंगेश बोरगावकर यांना दिग्गज वादकांनी उत्तम साथ दिली. तालमणी डॉ.राम बोरगावकर यांनी संगीत संयोजन केले व प्रा. गणेश बोरगावकर यांच्यासोबत तबल्यावर साथसंगतही केली. हार्मोनियमवर प्रा.लक्ष्मण श्रीमंगले, मंजिरीवादन प्रा. विश्वनाथ स्वामी तर मृदंगावर श्री. तुकाराम आव्हाड यांनी उत्कृष्ट साथ दिली. कार्यक्रमाचे सुरेल सूत्रसंचालन श्री. उद्धव फड यांनी केले. या भक्तीमय वातावरणात चित्रकार अनिता सावंत - देशपांडे व शुभेच्छा देशपांडे - वर्तक यांनी श्री विठ्ठलाचे अतिशय सुंदर चित्र लाईव्ह साकारून उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. लातूरकर रसिकांनी या संस्मरणीय कार्यक्रमास उत्स्फूर्त दाद दिली.

## भिवंडीत चार मजली इमारत कोसळली, नऊ जणांचा मृत्यू; मुख्यमंत्र्यांनी दिले कठोर कारवाईचे आदेश

**ठाणे/प्रतिनिधी** : भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील नारपोली गंगाराम वाडी येथील कोहिनूर अपार्टमेंट ही तळ अधिक चार मजली अतिधोकादायक ठरवलेली इमारत गुरुवारी रात्री साडे अकरा वाजताच्या सुमारास पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. या इमरतीच्या ढिगाऱ्याखाली अडकून सात जणांचा मृत्यू झाला असून, तीन ते चार जण आणखी ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

इमारत होती धोकादायक - कोहिनूर अपार्टमेंट ही २००७ मध्ये बनवण्यात आली असून, या इमारतीमध्ये दोन अपार्टमेंट आहेत. एका अपार्टमेंटमध्ये १५ असे एकूण ३० रूम या इमारतीमध्ये आहेत. परंतु, कमकुवत काम असल्याने सुरुवातीपासूनच इमारत धोकादायक झाल्याने पालिकेने ही इमारत धोकादायक घोषित केली होती. या इमारतीच्या एका विंगच्या तळमजल्यावर काही पिलर नादुरुस्त झाल्याने त्याची दुरुस्ती केली जात असल्याने सायंकाळी सहा वाजतापासूनच इमारतीला तडे जाण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे रात्री आठ वाजता इमारत एका बाजूने झुकत असल्याने पालिका प्रभाग समिती क्रमांक चारचे सहाय्यक आयुक्त अरविंद घोगरे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल होत इमरत निर्मनुष्य केली. परंतु, त्यानंतरही तळमजल्यावरील दुरुस्ती काम सुरू राहिल्याने व काही कुटुंबातील व्यक्ती साहित्य घेण्यासाठी इमारतीमध्ये आल्याने दुर्घटना घडल्यानंतर या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली आणखी तीन ते चार जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मुख्यमंत्र्यांनी दिले कठोर कारवाईचे आदेश - ''भिवंडीत इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. या प्रकरणात तत्काळ गुन्हा दाखल करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, असे आदेश महापालिका आयुक्तांना देण्यात आले आहेत.'

## लातूरच्या श्री केशव मित्र मंडळाचा नववा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर शहरातील केशव नगर परिसरातील श्री केशव मित्र मंडळाचा नववा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष सर्वोत्तम कुलकर्णी हे होते.

यावेळी प्रमुख पाहुण्या आणि मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका सौ. विनिता तेलंग यांची उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सद्यस्थितीत कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे सांगितले. कुटुंबात प्रत्येकाचा परस्परांशी नियमित सुसंवाद होत राहिला तर कुटुंबात एकही समस्या राहणार नाही. आजचा तरुण आपल्या भावना मोकळेपणाने कुटुंबातील सदस्यांसोबत व्यक्त करण्यास कचरतो. परिणामतः केवळ त्यांच्यातच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला नाहक मानसिक त्रासाचा सामना करावा लागतो. तरुणांनी विश्वासाने आपल्या कुटुंबाशी नियमित संवाद साधला तर त्यांच्या अनेक अडचणी - समस्या चुटकीसरशी सुटू शकतात, असे मतही सौ. तेलंग यांनी व्यक्त केले.

यावेळी सौ. तेलंग यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरवही करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव विलास आराध्ये गुरुजी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विस्तृतपणे विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरणराव भावठाणकर यांनी तर आभार प्रदर्शन पांडुरंग उर्फ बंडू किसवे यांनी केले. कार्यक्रमास अशोक मठपती गुरुजी यांच्यासह श्री केशव मित्र मंडळाचे सर्व सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

## देवेंद्र फडणवीस यांच्याइतके निर्णय मराठा समाजासाठी कोणीच घेतले नाहीत!- राधाकृष्ण विखे पाटील



**मुंबई/प्रतिनिधी** : मराठा समाजाच्या मागण्यांबाबत महायुती सरकार अत्यंत सकारात्मक असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात घेतलेली भूमिका आतापर्यंतच्या एकाही मुख्यमंत्र्याने घेतली नाही, असे प्रतिपादन मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शुक्रवारी केले. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर, सरकारने आतापर्यंत मराठा समाजासाठी घेतलेल्या निर्णयांचा व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल त्यांना पाठवला जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली. मागण्या पूर्ण न झाल्यास २९ ऑगस्टपासून पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर विखे पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारची भूमिका स्पष्ट केली. राज्य सरकारने वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीमुळे जरांगे यांच्यावर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येणार नाही, असा विश्वास व्यक्त करत ते म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात काही निर्णय रद्द झाल्याने समाजाचे मोठे नुकसान झाले होते. मात्र, फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने बंद पडलेल्या सर्व योजना पूर्ववत सुरू केल्या आहेत.

शिंदे समितीला २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, समितीने आतापर्यंत ५८ लाख कुणबी नोंदी शोधल्या आहेत आणि हे काम अजूनही सुरूच आहे. याशिवाय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पूर्ववत करणे, सारथी संस्थेतील जागा वाढवणे, आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना नोकऱ्या देणे आणि वैधता प्रमाणपत्राची मुदत वाढवून देणे असे अनेक ठोस निर्णय सरकारने घेतले आहेत. तसेच हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने आढावा घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

सरकारवर कोणत्याही इतर घटकाचा किंवा ओबीसी नेत्यांचा दबाव नाही, असे स्पष्ट करत विखे पाटील यांनी सांगितले की, मनोज जरांगे यांच्या मागण्या रास्त असल्या तरी सरकारने अंमलबजावणीत कोणतीही कसर सोडलेली नाही. ज्या काही अडचणी असतील त्या दूर केल्या जातील. सरकारचा आतापर्यंतचा सविस्तर अहवाल जरांगे यांना पाठवण्यात येईल आणि त्यातून त्यांचे नक्कीच समाधान होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## आभाळ कोसळले! बुलढाणा जिल्ह्यात अतिवृष्टीचे थैमान; नदी-नाल्यांना पूर, भिंत कोसळून महिला ठार

**बुलढाणा/प्रतिनिधी** : २९ जुलै अखेर असमाधानकारक पावसाची नोंद झालेल्या बुलढाणा जिल्ह्यात गत २४ तासात मुसळधार पावसाची नोंद झाली. काल गुरुवारी रात्रभर जिल्ह्यात जणू काही आभाळ कोसळल्या सारखा पाऊस झाला! जिल्ह्यातील तेराही तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. अनेक महसूल मंडळात ढगफुटी सदृश्य पावसाने थैमान घातले. यामुळे नदी नाल्याना पूर आले असून अनेक मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. लाखो हेक्टरवरील खरीप पिके पाण्याखाली गेली असून शेत शिवाराना तलावांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शेगावात घराची भिंत अंगावर कोसळून एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला आहे. काल गुरुवारी दिवसभर पावसाची रिमझिम सुरु होती. रात्री उशिरा दमदार पावसाला सुरुवात झाली. काही तासातच आभाळ फाटल्यासारख्या पावसाची नोंद झाली. जिल्ह्यातील १३ ही तालुक्यात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. जळगाव तालुक्यात सर्वाधिक म्हणजे २०७ मिलिमिटर इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली. त्या खालोखाल नांदुरा तालुक्यात १७५ पावसाने हजेरी लावली. बुलढाणा १०५ मिमी , चिखली ११०, देऊळगाव राजा ८३ सिंदखेड राजा ९८, लोणार १०० मेहकर १११, खामगाव १५२ मिमी, शेगाव १४०, मलकापूर १३१, मोताळा १०७, संग्रामपूर ११८ अशी इतर तालुक्यातील पावसाची आकडेवारी आहे.

# ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वरच्या दिंडीने वेधले लातूरकरांचे लक्ष

## पारंपारिक वेशभूषेतील महिलांसह वारकरी, तरुण व तरुणींचा सहभाग

**लातूर/प्रतिनिधी** : शहरातील गावभाग परिसरात असलेल्या ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षी भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या सप्ताहाच्या सांगता दिनी श्रीच्या नगरप्रदक्षिणेसाठी दिंडी काढण्यात येते. याही वर्षी काढण्यात आलेल्या ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वरच्या दिंडीने लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले. या दिंडीत पारंपारिक वेशभूषेतील महिलांसह वारकरी, तरुण, तरुणी व भाविकांचा उत्स्फुर्त सहभाग होता. पारंपारिक वेशभूषेतील अश्वांवर रुढ झालेल्या तरुणी व बाल वारकऱ्यांनी आपल्या सहभागाने या दिंडीची शोभा वाढवली होती.





लातूर शहरात गावभाग परिसरात असलेल्या श्री रामलिंगेश्वर देवस्थानच्या वतीने परंपरेनुसार भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या सप्ताहासाठी शहरासह परिसरातील भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. याही वर्षी या सप्ताहाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. सप्ताहाच्या सांगता दिनी श्रीची पालखीची नगरप्रदक्षणा काढण्यात येते. यानिमित्ताने श्री रामलिंगेश्वर मंदिरापासून आज सकाळी या दिंडीचा शुभारंभ झाला. खडक हनुमान, सुभाष चौक, गंज गोलाई, हनुमान चौक, महात्मा गांधी चौक, औसा हनुमानमार्गे या दिंडीचा समारोप श्री रामलिंगेश्वर मंदिराजवळ करण्यात आला. या दिंडीत भाविकांनी मोठ्या उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला होता. विशेष म्हणजे पारंपारिक वेशभूषेत महिलांनी डोक्यावर कळस घेवून भक्तीभावाने दिंडीत सहभाग घेतला होता. तसेच हरिरामाचा गजर करणाया वारकर्यांसह बाल वारकरी व अश्वावर रुढ झालेल्या तरुणी या दिंडीचे प्रमुख आकर्षण होते. ढोल, बँडपथक तसेच लातूर शहर परिसरातील भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता.

नगर प्रदक्षिणा मार्गावर व्यापायांसह नागरिकांनी दिंडीचे स्वागत करण्यासाठी ठिकठिकाणी रांगोळी काढून दिंडीवर पुष्पवृष्टी करण्यात येत होती. गंजगोलाई परिसरातील व्यापायांनी दिंडीत सहभागी झालेल्या भाविकांसाठी अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची सोय केली होती. दिंडीदरम्यान कायदा व सुव्यवस्था आबाधित ठेवण्यासाठी वाहतूकीची कोंडी सोडविण्यासाठी पोलिस बंदोबस्तही ठेवण्यात आला होता.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.